सकाळ अॅग्रोवन | विदर्भ
मंगळवार, २५ सप्टेंबर २०१८ | ६

# हिवरा कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने स्वच्छतेविषयी जनजागृती

**गोंदिया (प्रतिनिधी) :** हिवरा कृषी विज्ञान केंद्राच्या (गोंदिया) वतीने फेरी काढून स्वच्छतेविषयी जागृती करण्यात आली. केंद्र शासनाच्या स्वच्छता ही सेवा पंधरवाड्याअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. हिवरा कृषी तंत्र विद्यालयाचे विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी झाले होते.

१५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा पंधरवडा राबविला जात आहे. यानिमित्ताने केव्हीकेच्या वतीने जागृती फेरी काढण्यात आली. केव्हीकेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन. देशमुख, कृषी तंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. ओ. बावकार या वेळी उपस्थित होते. डॉ. एस. एन. देशमुख, गणेश खेडीकर यांनी या वेळी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. एल. एस. लिल्हारे, आय. जे. घरपेले, एस. एस. चवरे, के. एस. बनसोड, आर. डी. चौधरी, एम. एस. बोपचे, सोमनाथ गवते, आर. पी. चव्हाण, विशाल करणे, आर. डी. पातुर्डे, डोमाप्रसाद लिल्हारे या वेळी उपस्थित होते.